आगच्छत् शिक्षार्थम्। निर्गच्छत् सेवार्थम्।

# महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद, महाराष्ट्र

## School Leadership Academy

## Maharashtra

## मोड्यूल क्र.१७

# विद्यार्थ्यांना आवडीनुसार भावी व्यावसायिक क्षेत्र निवडण्यासाठी शाळास्तरावर शालेय नेतृत्वाची भूमिका

# The Role Of School Leadership at the School Level In Selecting Future Professional areas of Students Interest



## ❖ प्रस्तावना

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात अंतर्भूत असलेल्या काही ठळक बाबी आहेत, त्यामध्ये शिक्षणातून चारित्र्य निर्माण झाले पाहिजे.विद्यार्थ्यांमध्ये नैतिकता,तर्कबुद्धी व संवेदनशीलता निर्माण केली पाहिजे यासोबतच लाभदायक आणि समाधान देणाऱ्या रोजगारासाठी त्यांना सक्षम बनविले पाहिजे याचा उल्लेख करण्यात आलेला आहे. मुलांना जे शिकविले जात आहे, ते तर त्यांनी शिकावेच, त्याचबरोबर त्यांनी सतत शिकत राहण्याची कला देखील अवगत करावे हे रोजगाराच्या परिक्षेत्रात आणि जागतिक परिस्थितीच्या व्यवस्थेमध्ये वेगाने होणाऱ्या परिवर्तनामुळे खरोखरच आवश्यक झाले आहे.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये त्यांच्या अभिरुची क्षेत्राच्या आधारावर त्याला विविध अभ्यासक्रम पूर्ण करण्याची संधी देणे ही सध्याची गरज आहे आणि यानुसार जर विद्यार्थ्यांना आपल्या क्षेत्रामध्ये अभ्यास करण्याची संधी मिळाली,तर समाजाच्या आणि देशाच्या विकासाला चालना मिळेल आणि आजचे विद्यार्थी उद्याच्या विकासाची दिशा निश्चित करू शकतील .

आजच्या स्थितीमध्ये बरेचदा विद्यार्थ्यांवर कुटुंबाकडून समाजामध्ये प्रतिष्ठित मानले जाणारे अभ्यासक्रम त्यांनी पूर्ण करावे अशी जबरदस्ती करण्यात येते.त्यामुळे त्या क्षेत्रांमध्ये विद्यार्थ्यांची अभिरुची नसल्यास तो यशस्वी होईलच असे म्हणता येणार नाही अथवा अभ्यासक्रम पूर्ण करण्यामध्ये यशस्वी झाला तरी प्रत्यक्ष जीवनामध्ये आणि त्या अभ्यासक्रमाच्या क्षेत्रांत ज्ञानाचा उपयोग करण्यामध्ये यशस्वी होईल किंवा नाही हे सांगता येत नाही. अशा स्थितीत विद्यार्थ्यांची शैक्षणिक अभिरुची काय आहे याचा अभ्यास करून त्या अभिरुची क्षेत्राचा विकास विद्यार्थ्यांमध्ये करण्यासाठी शाळा, समाज आणि कुटुंब स्तरावर प्रयत्न केल्यास तो विद्यार्थी आपल्या अभिरुची क्षेत्रामध्ये यशस्वी झाल्या शिवाय राहणार नाही. यामुळे मुले केवळ यशस्वी होणार नाही. तर त्या क्षेत्रांमधील बारकावे समजून घेण्यासाठी त्या क्षेत्रातील विविध समस्या समजून घेऊन त्यांची सोडवणूक कशाप्रकारे करता येईल या संदर्भात ते आपल्या ज्ञानाचा प्रभावी वापर करू शकतील.

अशा स्थितीत शालेय नेतृत्वाने विद्यार्थ्यांना त्यांच्या अभिरुचीच्या आधारावर प्रवेशाची आणि अभ्यासाची संधी उपलब्ध करून दिल्यास विद्यार्थी मोठ्या हिरिरीने त्यामध्ये सहभागी होऊ शकतील आणि ते पूर्णतः समायोजित राहतील. शालेय नेतृत्वाने माध्यमिक स्तरावर विद्यार्थ्यांची शैक्षणिक अभिरुची, सर्जनशीलता आणि त्यांचे समायोजन यांमधील संबंधाचा अभ्यास करणे आवश्यक आहे, जेणेकरून या विद्यार्थ्यांच्या प्रगतीला चालना देण्यासाठी योग्य प्रकारचे शैक्षणिक निर्णय, शाळा, कुटुंब आणि समाज स्तरावर होऊ शकतील आणि एक निकोप समाज व्यवस्था निर्माण होण्याला चालना मिळेल.

## ❖ मोड्यूल अध्ययनाची उद्दिष्टे -

- विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार भावी व्यावसायिक क्षेत्र निवडण्यासाठी शाळास्तरावर शालेय नेतृत्वाची भूमिका समजून घेणे.
- माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची शैक्षणिक आवड (अभिरुची),सर्जनशीलता आणि समायोजन या संकल्पना समजून घेणे.
- या संकल्पनांचा अवलंब करून यश प्राप्त केलेल्या मुख्याध्यापकांच्या कार्याचा अभ्यास करणे.
- मुलांच्या शैक्षणिक आवडीनुसार भावी व्यावसायिक क्षेत्र निवडण्याबाबत काम करण्यासाठी शालेय नेतृत्वाचा दृष्टिकोन विकसित करण्यास मदत करणे.

❖ **विद्यार्थ्यांना शाळास्तरावर त्यांच्या आवडीनुसार भावी व्यावसायिक क्षेत्र निवडण्यासाठी संकल्पना**

विद्यार्थ्यांच्या विकासामध्ये त्यांच्या शैक्षणिक अभिरुचीची (आवड) भूमिका महत्त्वाची असते. ही अभिरुची काही प्रमाणात जन्मजात नसली,तरी तिच्या संदर्भात सुप्त गुण विद्यार्थ्यांमध्ये असतात. त्या सुप्त गुणांना प्रोत्साहन दिल्यास विद्यार्थ्यांमधील अभिरुची विकसित होते, या अभिरुचीला प्रोत्साहन दिल्यास त्यामध्ये विद्यार्थी यशस्वी होतो. शिवाय आवडीच्या क्षेत्रांमध्ये कार्य करीत असताना अथवा अध्ययन करीत असताना,विद्यार्थ्यामध्ये नव-नवीन बाबींचा शोध घेण्याची वृत्ती वृद्धिंगत होते. आणि ही बाब त्यांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहित करणारी आहे. या अभिरुचीला आणि त्या माध्यमातून त्याच्यामधील सर्जनशील वृत्तीला शालेय जीवनात योग्य प्रकारे दिशा प्राप्त झाल्यास त्यामध्ये विद्यार्थ्यांना समायोजन साधणे शक्य होते. अशाप्रकारे अभिरुचीच्या माध्यमातून निर्माण होणारी सर्जनशीलता आणि त्या क्षेत्रांमधील योग्य समायोजन यामुळे शालेय नेतृत्वाच्या पुढाकाराने विद्यार्थी आपल्या जीवनामध्ये यशस्वी होण्यास मदत होते.

विद्यार्थ्यांच्या विशिष्ट शैक्षणिक क्षेत्रातील आवडीला अभिरुची म्हणून संबोधण्यात आले आहे. विद्यार्थ्यांची कृषी विषयक,वाणिज्य विषयक, ललित कला,गृहविज्ञान, मानव विज्ञान,वैज्ञानिक आणि तांत्रिक या संदर्भातील अभिरुचीचा समावेश करण्यात आला आहे.

विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलता म्हणजे नवनिर्मिती करण्याची क्षमता होय. यामध्ये ओघवतेपणा,लवचिकता आणि मौलिकता यांचा मुख्यत्वेकरून विचार करण्यात यावा. तसेच परिस्थितीशी जुळवून घेण्याची विद्यार्थ्यांची क्षमता म्हणजे समायोजन होय. विद्यार्थ्यांच्या गृह समायोजन, आरोग्य समायोजन, सामाजिक समायोजन, भावनिक समायोजन व शालेय समायोजन या विविध घटकांच्या संदर्भातील स्थितीला समायोजन म्हणून संबोधण्यात आले आहे.

शालेय नेतृत्वाच्या योग्य भूमिकेमुळे माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची शैक्षणिक आवड (अभिरुची), सर्जनशीलता आणि त्यांचे समायोजन या संदर्भातील स्थिती समजून घेण्याची आवश्यकता आहे.जेणे करून या विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांमध्ये त्यांचे भविष्य उज्वल करण्याची संधी प्रदान करून, देशासाठी सर्जनशील आणि त्यामध्ये समायोजित व्यक्तिमत्व असलेले भावी नागरिक तयार करून समाजाच्या आणि देशाच्या विकासाला बळकटी देता येईल.

❖ **मुलांना भावी व्यावसायिक क्षेत्र निवडीसाठी शासनामार्फत सुरु असलेले कामकाज याबाबत सांख्यिकीय माहिती -** ( राष्ट्रीय ,राज्य ,विभाग,जिल्हा स्तरावरील ह्या बाबतची सांख्यिकीय माहिती )

विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार भावी व्यावसायिक क्षेत्र निवडण्यासाठी शासन स्तरावर करिअर पोर्टल सुरू करण्यात आले आहे. यामध्ये मुलांना भविष्यातील संधी व अभ्यासक्रमातील विविधता यांचा समावेश आहे. विद्यार्थी सरल आयडी व पासवर्ड ह्याचा वापर करून महाराष्ट्र करिअर पोर्टल मध्ये प्रवेश करू शकतात. व त्यातून करिअर विषयक माहिती,विविध व्यावसायिक कोर्सेस, अनेक शिष्यवृत्या व महाविद्यालये शोधण्यास मदत मिळते. करिअर पोर्टलचा वापर करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची २७ जानेवारी २०२१ ची जिल्हानिहाय स्थिती नमुना दाखल पुढीलप्रमाणे देण्यात आली आहे.

**राज्य ,विभाग व जिल्हा स्तरावरील सांख्यिकीय माहिती**

**मुलांच्या करिअर बाबत घेतलेल्या माहितीचा तक्ता**

PROGRESS REPORT (Chandrapur, Ahmednagar, Kolhapur, Thane have progressed the most)

***www.mahacareerportal.com*** ***District-wise monitoring report***

| New Rank | Old rank | District | Total TARGET (Logins Generated) | Total Unique Active users till 30th Dec'20 | Total Unique Active users till 27th Jan 2021 | Progress from 1st Jan'21 to 27th Jan |
|---|---|---|---|---|---|---|
| | a | b | c | d | e | f = e - d |
| 1 | 7 | Chandrapur | 72705 | 5779 | 23531 | 17752 |
| 2 | 3 | Kolhapur | 144423 | 12737 | 24366 | 11629 |
| 3 | 4 | Thane | 169603 | 8923 | 20186 | 11263 |
| 4 | 2 | Ahmednagar | 193376 | 40798 | 50645 | 9847 |
| 5 | 1 | Solapur | 171476 | 45126 | 52329 | 7203 |
| 6 | 6 | Nagpur | 163041 | 47615 | 53933 | 6318 |
| 7 | 12 | Mumbai City | 307193 | 7937 | 9568 | 1631 |
| 8 | 8 | Gadchiroli | 29357 | 4620 | 5942 | 1322 |
| 9 | 11 | Dhule | 83524 | 2127 | 2935 | 808 |
| 10 | 32 | Ratnagiri | 58983 | 308 | 1079 | 771 |
| 11 | 9 | Sindhudurg | 34446 | 4014 | 4650 | 636 |
| 12 | 10 | Akola | 68336 | 11197 | 11743 | 546 |
| 13 | 5 | Pune | 285476 | 22556 | 23013 | 457 |
| 14 | 34 | Parbhani | 63321 | 702 | 896 | 194 |
| 15 | 15 | Amravati | 92199 | 638 | 797 | 159 |
| 16 | 23 | Palghar | 74209 | 832 | 968 | 136 |
| 17 | 20 | Buldhana | 94711 | 914 | 992 | 78 |
| 18 | 14 | Osmanabad | 57414 | 219 | 292 | 73 |
| 19 | 17 | Beed | 131642 | 189 | 250 | 61 |
| 20 | 16 | Sangli | 109243 | 536 | 596 | 60 |
| 21 | 21 | Aurangabad | 150027 | 1716 | 1757 | 41 |
| 22 | 19 | Yavatmal | 86748 | 365 | 401 | 36 |
| 23 | 13 | Bhandara | 40530 | 1633 | 1657 | 24 |
| 24 | 27 | Nanded | 121476 | 1853 | 1875 | 22 |
| 25 | 22 | Satara | 122345 | 831 | 852 | 21 |
| 26 | 28 | Wardha | 44675 | 794 | 815 | 21 |
| 27 | 31 | Raigarh | 79434 | 305 | 324 | 19 |
| 28 | 18 | Nashik | 207181 | 1122 | 1140 | 18 |
| 29 | 29 | Jalgaon | 160543 | 542 | 557 | 15 |
| 30 | 25 | Latur | 108114 | 77 | 90 | 13 |
| 31 | 35 | Hingoli | 33030 | 35 | 45 | 10 |
| 32 | 26 | Nandurbar | 52748 | 617 | 625 | 8 |
| 33 | 30 | Gondia | 49259 | 82 | 90 | 8 |
| 34 | 33 | Jalna | 78630 | 36 | 44 | 8 |
| 35 | 24 | Washim | 55962 | 102 | 108 | 6 |
| 36 | 36 | Mumbai Suburban | 189 | 0 | 0 | 0 |
| | | TOTAL | 3795569 | 227877 | 299091 | 71214 |

❖ **शालेय नेतृत्वासमोर असलेली आव्हाने –**

**विद्यार्थ्यांशी व शिक्षकांशी संबंधित आव्हाने**

**१.शाळा स्तरावर मार्गदर्शन :**

शाळा स्तरावर शिक्षक मुख्याध्यापक आणि शाळा व्यवस्थापन मंडळांनी विद्यार्थ्यांची अभिरुची काय आहे याचा सातत्याने शोध घेणे आवश्यक आहे. परंतु ते होताना दिसत नाही. विद्यार्थ्यांना ज्या क्षेत्रांमध्ये आवड आहे,त्या क्षेत्रांमधील विविध संधी कोणत्या आहेत याचे मार्गदर्शन शाळा स्तरावर उपलब्ध करून देण्यात यावे.

**२. समुपदेशक आणि मार्गदर्शकांची शाळास्तरावर नेमणूक :**

विद्यार्थ्यांमधील अभिरुचीचा शोध घेण्यासाठी समुपदेशक आणि मार्गदर्शकांची सेवा शाळास्तरावर अधिग्रहित करण्यात यावी, जेणेकरून प्रत्येक विद्यार्थ्यांचे अभिरुची क्षेत्र कोणते आहे याचा अचूक अंदाज घेता येईल आणि त्यानुसार त्यांना मार्गदर्शन करता येईल.

**३. विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजित करणे :**

विद्यार्थ्यांमध्ये विविध सुप्त गुण असतात,या सुप्त गुणांमध्ये त्याची सर्जनशीलता लपलेली असते.या सर्जनशील वृत्तीला आणि कल्पनेला चालना देण्यासाठी विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजित करण्यात यावे. या कार्यक्रमांचा हेतू विद्यार्थ्यांच्या सर्जनशील वृत्तीला प्रेरणा देणे असावा,कोणतीही स्पर्धा यामध्ये नसावी.

**४. समायोजनामधील समस्या दूर करण्यासाठी प्रयत्न करणे :**

विद्यार्थ्यांच्या समायोजनाच्या क्षेत्रांमध्ये काय समस्या आहेत,याचा सातत्याने शोध घ्यावा,एखादा विद्यार्थी शाळेमध्ये इतर विद्यार्थ्यासोबत मिळून मिसळून रहात नसेल,अभ्यासामध्ये त्याची प्रगती सामान्य असेल, त्याला अभ्यासक्रमाशी समन्वयन साधताना अडचण होत असेल,तर त्याला कारणीभूत बाबी कोणत्या आहेत, याचा शोध घेऊन त्यांच्या समायोजनामधील समस्या दूर करण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे.

**५.पालकांचे समुपदेशन :**

विद्यार्थ्यांच्या समायोजनाची स्थिती जाणून घेण्यासाठी निवडक विद्यार्थ्यांचा वैयक्तिक अभ्यास करण्यात यावा. त्यामध्ये त्यांची सामाजिक आर्थिक स्थिती, भावनिक, सामाजिक स्थिती काय आहे याचा अभ्यास करून त्या संदर्भात समायोजनात्मक समस्या दूर करण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत. विद्यार्थ्यांचे अभिरुची क्षेत्र त्यांच्या समाजाला आणि सर्जनशील वृत्तीला चालना देते,अशा स्थितीत विद्यार्थ्यांना त्यांच्या अभिरुची क्षेत्रानुसार पुढील अभ्यासक्रम पूर्ण करता यावा यासाठी पालकांचे समुपदेशन करण्यात यावे.

**पालकांशी संबंधित आव्हाने**

**१. पालकांचा अट्टाहास :**

सर्वसामान्यपणे पालक,समाजामध्ये ज्या अभ्यासक्रमातून नौकरीची हमी लवकर असते अशा अभ्यासक्रमाच्या प्रवेशास प्राधान्य देतात त्यावेळी मुलांची आवड विचारात घेतली जात नाही..

**२.पालकांचे दुर्लक्ष :**

विद्यार्थ्यांच्या आवडी निवडी विचारात घेऊन त्यांच्याशी चर्चा करून त्यांची अभिरुची कशामध्ये आहे याचा शोध घेऊन त्यानुसार पाल्याला मार्गदर्शन करण्यात यावे, मात्र अनेकदा पालक दुर्लक्ष करतात,यावर कोणताही संवाद होत नाही. काहीवेळा अशिक्षित /आजारी/अत्यंत गरीब मजुरी करणारे पालक यांचेही याबाबत दुर्लक्ष होते.

**३.कुटुंब व्यवस्थेतील विसंवाद :**

विद्यार्थ्यांच्या मनानुसार त्याला त्याचे कार्य करण्याची मुभा दिल्यास त्याचे समायोजन प्रभावी होते परंतु कौटुंबिक स्तरावर निर्माण करण्यात आलेल्या नियमांमुळे अथवा वादांमुळे विद्यार्थी प्रभावी समायोजन साधू शकत नाही त्याचा विपरीत प्रभाव विद्यार्थ्यांच्या भावी जीवनावर होतो. आपल्या पाल्यामध्ये कोणते गुण आहेत,त्याची रुची कशामध्ये आहे,तो कोणत्या बाबीकडे सर्वाधिक लक्ष देतो, कोणत्या कृती तो वारंवार करतो याकडे कुटुंब स्तरावर लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

**समाजासंबंधीची आव्हाने**

**१.सामाजिक गरजा :**

समाजाच्या वर्तमान गरजा विचारात घेऊन पाल्यांना त्या गरजांची पूर्तता करण्यासाठी विशिष्ट अभ्यासक्रमामध्येच प्रवेश देण्याची प्रवृत्ती आणि सदय:स्थितीमध्ये प्रतिष्टित मानल्या जाणा-या अभ्यासक्रमाच्या आधारावर त्या कुटुंबाची प्रगती, शिक्षण याचा अंदाज न बांधता विदयार्थ्यांच्या अभिरूची क्षेत्रानुसार त्याना अभ्यासक्रम निवडण्यासाठी प्रोत्साहन मिळणे गरजेचे आहे.

**२.कमी गुण प्राप्त करणा-या विदयार्थ्यांसाठी मार्गदर्शन आणि सुविधा उपलबध करून देणे :**

समाजामध्ये गुणांना सर्वाधिक महत्व देण्यात येते. कमी गुण प्राप्त करणा-या विदयार्थ्यांकडे उपहासात्मक दृष्टीने पाहिले जाते. परंतु कमी गुण प्राप्त करणा-या विदयार्थ्यांमध्ये सुध्दा त्यांच्या अभिरूची क्षेत्रानुसार मार्गदर्शन आणि सुविधा उपलबध करून दिल्यास,त्याच्या क्षेत्रामध्ये ते यशस्वी होऊ शकतात याचा विचार सामाजिक स्तरावर होणे गरजेचे आहे.देशाच्या भावी गरजा विचारात घेऊन,ज्याला ज्या क्षेत्रामध्ये आवड आहे त्या क्षेत्रामध्ये करिअर करण्याची संधी सामाजिक स्तरावर उपलब्ध करून दिली पाहिजे. त्यासाठी समाजातील सुशिक्षित,विविध व्यक्ती आणि संघटनांनी प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे.

- विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार भावी व्यावसायिक क्षेत्र निवडण्यासाठी शाळास्तरावर **मुख्याध्यापकाची यशोगाथा - शाळेचे नाव : न्यू इंग्लिश हायस्कूल अकोला, मुख्याध्यापक : श्री माधव सुधाकर मुनशी**

आजच्या बदलत्या काळातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी विद्यार्थ्यांमधील उपजत कला गुणांचा विकास करणे महत्वाचे आहे, हे जाणून शाळा व शिक्षक विद्यार्थ्यांच्या अंगभूत गुणांना समजून घेण्याचा प्रयत्न करीत असतात व त्यांच्या सुप्त गुणांना चालना देण्याचे कार्य करीत असतात. न्यू इंग्लिश हायस्कूल अकोला

मधील शिक्षकांनी शाळेचे मुख्याध्यापक श्री माधव सुधाकर मुन्शी यांच्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांच्या विज्ञान क्रीडा, नाट्य, भाषा, संगीत, चित्रकला,वक्तृत्व असा विविधांगी सुप्त कलागुणांना वाव देण्याचा प्रयत्न केला. शाळेतील विविध उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या आवडी व कौशल्याची नोंद शिक्षकांनी घेतली व त्यांच्या आवडीनुसार विविध स्पर्धांची संधी मुलांना उपलब्ध करून देण्यात आली. यातूनच काही विद्यार्थ्यांनी खेळामध्ये अगदी राष्ट्रीय स्तरापर्यंत मजल मारली. इफतअंजुम या हिंदी भाषिक विद्यार्थिनीने संस्कृत विषयात मिळविलेले यश तर शाळेसाठी भूषणावह आहे . अशा दोन विदयार्थ्यांची माहिती आपणास देत आहोत.




**इफत अंजुम - संस्कृत भाषा : एक ध्यास**

इफतअंजुम रमजू गवरे, गवळीपुरा येथे राहणारी, घरामध्ये हिंदी-उर्दू भाषेत संभाषण आणि पहिली ते चौथी पर्यंत म. न. पा. शाळेत हिंदी माध्यमातून शिक्षण,अशा वातावरणातून आलेली विद्यार्थिनी एस. एस. सी. बोर्ड परीक्षेत संस्कृत भाषा विषयात १०० पैकी ९८ गुण मिळविते,ही बाब केवळ वाखाणण्याजोगी नाही तर प्रेरणादायी आहे.गरीब परिस्थिती, भाषा, अभ्यासाला पोषक वातावरणाचा अभाव अशी कारणं यशाच्या आड येत नाहीत हेच इफतअंजुमने सिद्ध केले. शिक्षकांकडून मिळालेली प्रेरणा, स्वतःमध्ये असलेली चिकाटी, प्रयत्न काय करू शकतात याचं उदाहरण म्हणजे इफत. विषय शिक्षिका सौ. स्मिता कुळकर्णी (माजी उपमुख्याध्यापक) आणि सौ. दीपिका आगरकर यांनी संस्कृत विषयाची गोडी विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्याचे काम तर केलेच,पण इफतमध्ये असलेली पाठांतर क्षमता, स्पष्ट शब्दोच्चार ओळखून प्रार्थनेच्या वेळी संस्कृत मधून प्रतिज्ञा म्हणण्यास प्रेरित केले.सौ.दिपीका आगरकर यांनी वर्ग 9 वी आणि 10 वी मध्ये संस्कृत विषयाची आवड वाढावी या दृष्टीने विविध उपक्रम राबविले.

कविकुलगुरू कालिदास, डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन व रामाचे बंधुप्रेम या विषयांवरील निबंध लेखन स्पर्धेमध्ये बक्षीस मिळवून शाळेचा गौरव वाढविला. यामुळे या विषयाची रुची वाढत गेली आणि वाचन प्रशंसा या कवितेचे उत्तम सादरीकरण करून तिने सर्वांची शाबासकी देखील मिळवली. संस्कृत भाषेतून सूत्रसंचालन तसेच संस्कृत भाषेतून प्रश्नमंजूषा आयोजन आणि विविध शैक्षणिक साहित्य (फ्लॅश कार्ड, साहित्य सूची इ.) तयार केले.अकोला येथील खंडेलवाल शाळेमध्ये झालेल्या संस्कृत पाठांतर-लेखन स्पर्धेत 'महालक्ष्मी स्तोत्र'

सादरीकरणासाठी विशेष पुरस्कार मिळाला होता. तिच्या या गौरवानंतर मुस्लिम समाजातर्फे तिच्यासाठी कौतुक सोहळा घेण्यात आला होता.भारतीय संस्कृती ज्ञान परीक्षा तिने दिली.कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ रामटेक, नागपूर या विध्यापिठात संस्कृत विषयाची गोडी असलेल्या विद्यार्थ्यांना पीएच.डी. पर्यंतचे शिक्षण मोफत दिले जाते, तिथे तिची निवड झाली. संस्कृत विषयातील ही गोडी दहावीनंतर ही कायम राहिली आणि म्हणून आर.एल.टी. कॉलेज अकोला मध्ये विज्ञान शाखेमध्ये प्रवेश घेतल्यावर संस्कृत विषय विद्यार्थी संख्येअभावी घेता येणार नाही. असे जेव्हा कळले तेव्हा त्या कॉलेजमधून दुसरीकडे, जिथे संस्कृत विषय आहे. तिथे प्रवेश घेण्याचा तिने निर्धार केला. तिचा हा निर्धार पाहून कॉलेजच्या प्राचार्यांनी तिला विशेष परवानगी दिली,अशा पद्धतीने आठवीमध्ये परिचित झालेला हा विषय जीवनाचे ध्येय बनू शकतो हे इफतने सिद्ध केले.शाळेचे मुख्याध्यापक या नात्याने अशा विद्यार्थ्यांना शोधून काढणे,त्यांना प्रोत्साहन देणे ही प्रक्रिया सजगपणे पार पाडत असताना उपमुख्याध्यापक श्री रेलकर सर, पर्यवेक्षक सौ दंडे मॅडम आणि सर्व शिक्षक यांचा पाठिंबा सर्व विद्यार्थ्यांना मिळत असतो.



**वाजीद शेख : प्रेरणादायी प्रवास**

वाजीद मोहम्मद साबीर शेख अत्यंत नम्र,मनमिळावू आणि शांत स्वभावाचा विद्यार्थी. टेलर काम करून हलाखीच्या परिस्थितीत वडिलांनी पाचवी पर्यंत इंग्रजी माध्यमात शिकविले.परंतु आर्थिक अडचणीमुळे न्यू इंग्लिश हायस्कूल, येथे सेमी इंग्लिश माध्यमासाठी प्रवेश घेतला. वाजीदच्या बाबतीतही घरी बोलली जाणारी भाषा उर्दू-हिंदी, पाचवी पर्यंत इंग्रजी माध्यमातील शिक्षण आणि आता मराठी माध्यम या सगळया अडथळयांवर वेगवेगळया टप्प्यांवर भेटलेले शिक्षक, त्यांची मदत, त्यांचे प्रोत्साहन या सगळयांमुळे वाजीद वेगवेगळया कार्यक्रमात मराठी मध्ये भाषण देऊ लागला, तसेच उत्तम सूत्रसंचालन करून शिक्षकांची शाबासकी मिळवित राहिला. वेगवेगळया स्पर्धा परीक्षांमध्ये भाग घेणे, विषयांचा सखोल अभ्यास करणे यामुळे त्याचा अभ्यासातील प्रगतीचा आलेख कायम उंचावत राहिला. वर्गशिक्षक आणि विषय शिक्षक श्री थुटे सर यांच्या मार्गदर्शनामुळे त्याची इतिहास आणि मराठी या विषयांतील गोडी वाढत गेली. मुख्याध्यापक या नात्याने दहावीचा निकाल वाढवा या दृष्टीने विशेष मेहनत घेण्यात आली आणि त्याचा परिपाक म्हणजे वाजीद याने मराठी विषयात १०० पैकी ९७ गुण मिळविले. तर सौ.दीपिका आगरकर यांच्या मार्गदर्शनामुळे संयुक्त संस्कृत मध्ये ५० पैकी ४९ गुण मिळविले. प्रेरणा मिळाली, प्रोत्साहन मिळाले की

आपोआपच विद्यार्थ्यांच्या चित्तवृत्तीमध्ये फरक दिसतो. माध्यम, आर्थिक परिस्थिती अशा कोणत्याच गोष्टी आपल्या स्वप्नांच्या आड येत नाहीत हे वाजीदने  दाखवून दिले. भविष्यात डॉक्टर होऊन समाजाचे ऋण फेडायचे आहे  म्हणणारा वाजीद कितीही मेहनत करायला तयार आहे. त्याचे हे स्वप्न पूर्ण व्हावे म्हणून संपूर्ण शाळा-कुटुंब कायम त्याच्या पाठीशी राहील.

**सूरज : पाठीवर हात ठेवून फक्त 'लढ' म्हणा**

सूरज गाडे,राहणार अनकवाडी ता.जि.अकोला.अकोला येथे शाळेत येण्यासाठी करावा लागणारा संघर्ष या गावाला प्रत्यक्ष भेट दिल्यानंतर कळला.अकोल्यापासून १३ कि.मी.अंतरावर,मुख्य रस्त्यापासून गाव तीन किलोमीटर आत आहे. अनकवाडीहून पायी किंवा सायकलने अंतर कापत येत असताना वाटेत लागणारा नाला, ज्यावर पूल नव्हता. पावसाळयात पाणी -चिखल साचलेले .शाळेत येणारी  सर्व मुलं साखळी बनवून नाल्यातून वाट काढत येत असत. कधीकधी हे पाणी या लहानग्यांच्या  छातीपर्यंत आलेले असायचे. नाल्याजवळ एका  अजगराचे वास्तव्य आहे. हा सर्व प्रवास करीत, फाट्यावर पोहोचल्यावर सायकली फाट्यावर सोडून द्यायच्या आणि एसटीने अकोल्यापर्यंत यायचं. पाऊस, थंडी, ऊन हे सगळं सहन करीत शाळेत वेळेत पोहोचणारा सूरज आणि त्याचा संघर्ष थोरामोठ्यांना खूप काही शिकवून जातो. ग्रामीण भागाची पार्श्वभूमी असलेला व सर्वसाधारण शेतकरी कुटुंबात जन्माला आलेल्या सूरजला शहरातल्या शाळेत रुळायला काहीसा वेळ लागला. ग्रामीण भागातून आलेली मुलं शहरातल्या शाळेत येतात तेव्हा शाळेतल्या शिक्षकांमुळे हे रुळणं सोपं जातं असं त्याचं म्हणणं.अभ्यासात हुशार असणारा सूरज काहीसा अबोल होत गेला,त्याच्या आईला झालेल्या  कॅन्सरसारख्या दुर्धर आजारामुळे. त्या आजारामुळे कुटुंबाची  आर्थिक ओढाताण सुरू झाली.

या सगळयाचा परिणाम सूरजवर वेगळया प्रकारे होत गेला. आई-वडील उपचारासाठी बाहेरगावी असल्यामुळे. लहान भाऊ आणि आजी यांचा सांभाळ करण्याची जबाबदारी अप्रत्यक्ष सूरजने आपल्या खांद्यावर उचलली. कुटुंबाला आर्थिक मदत व्हावी म्हणून सुटीच्या दिवशी तो मजूरीच्या कामाला जाऊ लागला. पुस्तक वाचण्याची आवड त्याला दिशादर्शक ठरली. R.S.P.परेड,विविध स्पर्धा परीक्षा,खेळ यामध्ये सहभागी होणाऱ्या सूरजने एस.एस. सी.परीक्षेत ८२% गुण मिळविले. परिस्थितीवर मात करायची असेल तर शिक्षण ही खूप मोठी संधी आहे हे त्याने जाणलले. वर्गशिक्षक थुटे सरांच्या मदतीने, त्यांच्या प्रेमामुळे आपण कोणतेही संकट पार करू शकू असा त्याला विश्वास वाटू लागला. शाळेतील उत्साही वातावरण, विविध उपक्रम, विशेषतः सामान्यज्ञानावर आधारित स्पर्धा यामध्ये रमणाऱ्या सूरजने IAS ऑफिसर होण्याचे स्वप्न बघितलं आहे. त्याचे हे स्वप्न नक्कीच पूर्ण होईल.त्याची आई पूर्णतः बरी होऊन त्याला मोठं होताना पाहू देत. अशी इच्छा सर्वांच्या मनात आहे. कोणाकडे मदत न मागणारा स्वाभिमानी सूरज कुसुमाग्रजांच्या 'कणा'  कवितेतला 'पाठीवरती हात ठेवून फक्त 'लढ' म्हणा' असं म्हणणारा विद्यार्थी वाटावा, या स्वाभिमानी विद्यार्थ्यांचा आम्हाला कायमच अभिमान वाटत  राहील.

**चिंतनात्मक  प्रश्न**

वरील यशोगाथेस अनुसरून  तुमचे मत / अभिप्राय लिहा.

१. विदयार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा म्हणून शाळेत कोणकोणते उपक्रम राबवावे असे तुम्हांला  वाटते?

२. विदयार्थ्यांच्या उपजत कलागुणांचा शोध कसा घ्यावा?

**विचार करू आणि चर्चा करू -**

- विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार भावी व्यावसायिक क्षेत्र निवडण्यासाठी शाळास्तरावरील शालेय नेतृत्वाने कोणती भूमिका घेणे आवश्यक आहे.
- मुलांना पुढील व्यावसायिक क्षेत्र निवडण्यासाठी शाळास्तरावर शालेय नेतृत्वाने कोणकोणत्या संधींची उपलब्धता करून देणे आवश्यक आहे .

❖ **शाळा विकास आराखडा / नियोजन -**

सध्या तुम्ही कार्यरत असलेल्या शाळेतील विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार भावी व्यावसायिक क्षेत्र निवडण्यासाठी संधींची उपलब्धता करून देण्यासाठी, विविध बाबी शाळा विकास आराखड्यामध्ये समाविष्ट करण्याबाबत प्रयत्न करावेत. तुमच्या शाळेचे सकारात्मक घटक व कच्चे दुवे याची तुम्हाला जाणीव आहे,उपलब्ध मनुष्यबळ व त्यांच्यासोबत च्या आंतरक्रिया याबद्दलची तुम्हास माहिती आहे. या सर्व बाबींचा एकत्रित विचार करून पुढील एक वर्षाचा शाळा विकास आराखडा तयार करा.

❖ **विद्यार्थ्यांना आवडीनुसार भावी व्यावसायिक क्षेत्र निवडण्यासाठी शाळास्तरावर शासनाच्या प्रत्यक्ष सुरू असलेल्या विविध लाभाच्या योजना –**

- करिअर निवडीबाबत शासनाने करियर पोर्टल www.mahacareerportal.com सुरू केले असून त्याचा सर्व विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा.
- जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था स्तरावर समुपदेशकाच्या माध्यमातून करिअर निवडी संदर्भात मुलांची आवड,सर्जनशीलता व समायोजन याबाबत सातत्याने माहिती घ्यावी. त्यासाठी ते पूर्णवेळ उपलब्ध असतात.
- इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी कल चाचणी चे आयोजन.
- राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे यांच्या मार्फत जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था स्तरावर इयत्ता १०वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी मानसिक (psychological) चाचणी चे आयोजन.

❖ **विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक संधी उपलब्धतेसाठी मुख्याध्यापकांना असेही करता येईल -**

महाराष्ट्रात विद्यार्थ्यांना व्यावसायिक संधी उपलब्धतेच्या बाबतीत पालकांमध्ये व मुलांमध्ये संभ्रम दिसून येतो. त्यातून शाळांमधील शिक्षक, विद्यार्थी व मुख्याध्यापक यांना अनेक अडचणी येतात. या अडचणींवर मात करण्यासाठी मुख्याध्यापकांना असेही करता येईल....

- विविध प्रकारच्या कोर्सेस बाबत माहितीपर कार्यक्रम आयोजित करणे.
- विद्यार्थ्यांना व्यावसायिक संधी उपलब्धतेसाठी मुख्याध्यापकांनी शाळा स्तरावर मुलांना मार्गदर्शनासाठी समुपदेशक आणि मार्गदर्शकांची पर्यायी नेमणूक करणे.
- शासनाने वेळोवेळी दिलेल्या प्रशिक्षणाचा लाभ घेऊन मुख्याध्यापकांनी व शिक्षकांनी स्वतः ला सक्षम करणे.
- शालेय व्यवस्थापन समिती, सामाजिक संस्था,पालक,व इतर व्यवसाय अभ्यासक्रम मार्गदर्शन करणारे कर्मचाऱ्यांशी परस्पर पूरक समन्वय ठेवून मुलांसोबत शालेय भेटीचे नियोजन करणे.
- स्पर्धा परीक्षा व इतर कलाकौशल्य यात प्रावीण्य संपादन करणाऱ्या मुलांचा व पालकांचा सत्कार करणे आणि त्यांच्या प्रकट मुलाखतीचा कार्यक्रम शाळेत आयोजित करणे व त्यांचा गौरव करणे.
- इयत्ता नववी ते बारावी पर्यंतच्या मुलांना नियमितपणे समुपदेशकांमार्फत समुपदेशन उपलब्ध करून देणे आणि आणि त्यांचे वेळोवेळी अनुधावन करणे.
- महा करिअर पोर्टल च्या वापराबाबत शाळेत एक स्वतंत्र कक्ष (सेल) निर्माण करणे.

- या कक्षाच्या माध्यमातून मुलांच्या शंकांचे निरसन व विद्यार्थ्यांसाठी शासनाकडून मिळत असलेल्या विविध लाभांच्या योजनांची माहिती मुलांना सतत अवगत करीत राहणे.
- विद्यार्थ्यांना व्यावसायिक संधी उपलब्धतेसंदर्भात मुलांची आवड,सर्जनशीलता व त्यामध्ये त्यांचे होणारे समायोजन याबाबत शिक्षकांना वेळोवेळी अवगत करावे.
- शासनाच्या या संबंधित विविध योजनांतर्गत प्रशिक्षणे आणि माहिती पत्रकांचा लाभ शिक्षकांना सतत देण्यात यावा आणि त्यातून शिक्षकांना विद्यार्थी सक्षम करण्यासाठी तयार करण्यात यावे.

❖ **विद्यार्थ्यांना आवडीनुसार भावी व्यावसायिक क्षेत्र निवडण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० यात केलेला विचार -**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने मुलांच्या आवडीनुसार शिक्षणामध्ये संधी असाव्यात. याबाबत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील लक्षवेधी व इतर मुख्य क्षेत्रे या भाग तीन मधील प्रकरण वीस,व्यावसायिक शिक्षण यामध्ये मुलांची शैक्षणिक आवड, सर्जनशीलता व त्यांचे समायोजन यानुसार शिक्षणाच्या संधी उपलब्ध होण्याबाबत आग्रही भूमिका व्यक्त करण्यात आली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांमध्ये इयत्ता सहावी पासूनच व्यावसायिक शिक्षण दिले जाणार आहे.बालवयातच मुलांना व्यावसायिक शिक्षण दिल्यास मुले स्वतःचा व्यावसाय सुरु करतील व त्यातून कुशल मनुष्यबळ निर्मिती करण्याचा उद्देश्य आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये शालेय शिक्षणातील मुलांच्या आवडीनुसार संधी मधील दरी कमी करण्यावर,लक्ष केंद्रित करण्यावर स्वतंत्र कार्यनीती तयार केली आहे. विद्यार्थ्यांना व्यावसायिक संधी उपलब्धतेसाठी मुख्याध्यापकांना शाळा स्तरावर मार्गदर्शनासाठी समुपदेशक आणि मार्गदर्शकांची नेमणूक, विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजित करणे आणि शिक्षकांची भूमिका याबाबत अधिक सकारात्मक करणे इत्यादी अनेक बाबी करता येतील.

**शालेय शिक्षणा अंतर्गत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये व्यावसायिक शिक्षणाबाबत महत्वाच्या मुद्देनिहाय बाबी –**

१. व्यावसायिक शिक्षणाशी संबंध जोडल्या गेलेल्या सामाजिक दर्जाच्या उतरंडीवर मात करणे हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे.त्यासाठी टप्प्याटप्प्याने सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये व्याव्सायीक्शिक्षण कार्यक्रमांचे एकात्मीकरण आवश्यक आहे. लहान वयातच पूर्वमाध्यमिक व माध्यमिक शाळेत व्यवसायाची ओळख करून देण्यास सुरुवात करून गुणवत्तापूर्ण व्यावसायिक शिक्षणाचे एकात्मीकरण केले जाईल.

२. सन २०२५ पर्यंत ५०%विद्यार्थ्यांना शालेय व्यवस्थेतून व्यावसायिक शिक्षणाची ओळख होईल .

३.पुढील दशकात टप्प्याटप्प्याने सर्व माध्यमिक शाळांच्या शैक्षणिक कार्यक्रमात व्यावसायिक शिक्षण समाविष्ट केले जाईल.

४.माध्यमिक शाळा,ITI ,पोलिटेकनिक ,स्थानिक उद्योग यासोबत सहयोग करतील.शाळांमध्ये कौशल्य प्रयोग शाळांची स्थापना केली जाईल व इतर शाळांना याचा लाभ घेता येईल.

❖ **शालेय नेतृत्वाच्या दृष्टीकोनातून मोड्यूलची उपयुक्तता -**

शालेय शिक्षणात मुलांच्या करिअर निवडी मधील शैक्षणिक अभिरूची,सर्जनशीलता व त्यांचे समायोजन या क्षेत्रांतील शिक्षणाबाबत च्या समस्या नेहमी दुय्यम स्वरूपाच्या राहिल्या आहेत. समस्याबाबत आजपर्यंत फारसा विचार करण्यात आलेला नाही. असे निरीक्षणातून दिसून येते. त्यामुळे सदर मोड्यूल चा उपयोग अशा प्रकारच्या कार्यक्षेत्रात काम करणाऱ्या नेतृत्वाला तर होईलच,पण इतर क्षेत्रातील शैक्षणिक नेतृत्व करणाऱ्या व्यक्तींसाठीही हे निश्चितच उपयुक्त ठरणार आहे.या मोड्यूलमुळे पुढील परिणाम साधता येतील.

- शिक्षण हक्क कायदा २००९ ची यशस्वी अंमलबजावणी.

- प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या आवडीनुसार करिअरच्या संधी.
- शालेय स्तरावरच या बाबत गांभीर्यपूर्वक विचार झाल्याने भविष्यातील संधी निवडण्या संदर्भात मदत.
- प्रत्येक विद्यार्थ्यांचा शिक्षण हक्क बाधित होऊ न देता शिक्षण प्रक्रिया.

## ❖ समारोप

अशा प्रकारे शालेय नेतृत्वाने विद्यार्थ्यांना त्यांच्या आवड व अभिरुचीच्या आधारावर प्रवेशाची आणि अभ्यासाची संधी उपलब्ध करून दिल्यास विद्यार्थी मोठ्या हिरिरीने त्यामध्ये सहभागी होऊ शकतील आणि त्यामध्ये ते पूर्णतः समायोजित राहतील. यामुळे शालेय नेतृत्वाने माध्यमिक स्तरावर मुलांच्या व्यावसायिक संधी उपलब्धतेसाठी विद्यार्थ्यांची शैक्षणिक अभिरुची,सर्जनशीलता आणि त्यांचे समायोजन यामधील संबंधाचा अभ्यास करणे आवश्यक आहे,जेणेकरून या विद्यार्थ्यांच्या भावी प्रगतीला चालना देण्यासाठी योग्य प्रकारचे शैक्षणिक निर्णय शाळा, कुटुंब आणि समाज स्तरावर होऊ शकतील आणि एक निकोप समाज व्यवस्था निर्माण होण्याला चालना मिळेल.

## ❖ संदर्भ साहित्य –


- शालेय नेतृत्व विकास कार्यक्रम, पूरक वाचन साहित्य, महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था ( मिपा ) औरंगाबाद.
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०
- निष्ठा, मुख्याध्यापक आणि शिक्षक यांच्या समग्र प्रगतीसाठी राष्ट्रीय पुढाकार डिसेंबर २०१९, संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे.
- संचालक, महाराष्ट्र विद्या प्राधिकरण पुणे,जानेवारी २०१८ , शालेय नेतृत्व विकास कार्यक्रम पूरक वाचन साहित्य.
- महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था ( मिपा ) औरंगाबाद संस्थेचे ४ मोड्यूल.
- Hand book of NIEPA NEW DELHI.
- https://youtu.be/Na4to_MZ-j0
- https://youtu.be/7aVIq5irvnE
- https://youtu.be/VXhRsoRwdqk



| **मोड्यूल विकसक** | **समन्वयन** | **मार्गदर्शक** |
|---|---|---|
| डॉ. जितेंद्र काठोळे | डॉ.ज्योती कुलकर्णी | डॉ.नेहा बेलसरे |
| विषय सहायक | समन्वयक | संचालक |
| जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अकोला | महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद | महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद |